पाक्षिक
वार्षिक वर्गणी रु. २५
वर्ष ८ वे, अंक ७ वा
किंमत १ रुपया
२१ जुलै १९९१

शेतकरी संघटक

# नाणे निधी – एक शेवग्याचे झाड

**– शरद जोशी**

नेहरू अर्थशास्त्राचा पाडाव झाला आहे, याची कबुली लाजत लाजत लपूनछपून दिली जात आहे. देशाची प्रगती व्हायची असेल तर जुन्या व्यवस्थेत आमूलाग्र बदल व्हायला पाहिजे हे मान्य केले जाते. अर्थव्यवस्था अधिकाधिक मुक्त व्हावी, लायसेन्स-परमीटचे राज्य जावे, सूट सबसीडींचे खेळ बंद करावे, रोजगार व्यवसायास महत्त्व द्यावे, हे सगळे म्हटले जाते. पण, हे म्हटले जात असताना नेहरूंचे नाव घेऊन त्यांनी सांगितलेल्या अर्थशास्त्राचा पाडाव झाला आहे असे कुणी म्हणत नाही.

नेहरूवादाचा पाडाव हा अपरिहार्यच होता. शेतकरी आंदोलनाची आर्थिक भूमिका हीच मुळात नेहरूवादाविरुद्ध होती. स्टॅलिनने रणगाड्याने केले ते नेहरूंनी जास्त सभ्य मार्गाने केले, एरव्ही फरक काही नाही. हे संघटनेने आवर्जून सांगितले. स्टॅलिनने शेतकऱ्यांवर रणगाडे पाठवले त्याच दिवशी सोव्हियेट युनियनमधील कम्युनिझमचा पाडाव झाला होता. त्यानंतर जिवाच्या आकांताने प्रयत्न झाले ते कम्युनिझमची अवस्था कशीबशी सांभाळून नेण्यासाठी. कम्युनिस्ट अर्थव्यवस्थेच्या श्रेष्ठतेच्या वल्गना झाल्या, पण तिचा पाडाव झाला आहे हे सोवियेट संघातील धुरिणांनासुद्धा पक्के उमजले होते. ख्रुश्चेवने काही प्रमाणात मुक्त अर्थव्यवस्था आणण्याची सुरुवात केली. पण तो प्रयत्न यशस्वी झाला नाही. त्यानंतर तीन दशके उलटून गेल्यानंतर मुक्त व्यवस्थेची खुलेआम घोषणा करणारा गोर्बाचेव अवतरला. नेहरूवादाचा खुलेआम धिक्कार करणारा भारतीय गोर्बाचेव प्रकट व्हायला किती वर्षे लागतील कुणास ठाऊक? नेहरू महात्मा गांधींचे राजकीय वारस होते, पण आर्थिक प्रश्नांवरील दोघांच्या विचारात सापमुगसाचे वैर होते. नेहरूंच्या औद्योगिक धोरणाविरुद्ध आपणास लढा द्यावा लागेल आणि प्रसंगी नेहरूराजवटीच्या तुरुंगात जावे लागेल असे गांधींनी स्पष्ट नमूद केले होते. गांधीनेहरू हा द्वंद्वसमास वेदोपनिषद या समासासारखा आहे. आर्थिक प्रश्नांवर तरी नेहरू आणि गांधी उलटी टोके होती.

> **औद्योगिकरण म्हणजे प्रगती नव्हे, औद्योगिकीकरण हे प्रगतीचे एक लक्षण आहे.**
>
> **समग्र समाजाच्या आर्थिक, सामाजिक स्वातंत्र्यकक्षा रुंदावण्याची प्रक्रिया म्हणजे विकास.**
>
> **पन्नास वर्षांनी का होईना, 'नेहरू-अर्थशास्त्र' आज नागडे पडले आहे..... पर्यायी अर्थशास्त्र शोधण्याकरिता त्यांना आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडे पाहाण्याची गरज नव्हती. शेतकरी आंदोलनाचे साहित्य त्यांनी चाळले असते तरी त्यांना पर्याय स्पष्ट दिसला असता.**

नेहरू - अर्थशास्त्र म्हणजे काय? या अर्थशास्त्राची दोन प्रमुख सूत्रे आहेत.

(१) औद्योगिकीकरण म्हणजे प्रगती आणि औद्योगिकीकरण जास्तीत जास्त वेगाने घडवून आणले पाहिजे.

(२) औद्योगिकरण झपाट्याने घडवून आणण्यासाठी शासन आणि सार्वजनिक क्षेत्र यांच्यावर प्रमुख जबाबदारी राहील.

औद्योगिकीकरण म्हणजे प्रगती असे मानण्यात नेहरूविचारावरील पाश्चिमात्य पगडा स्पष्ट होतो. पश्चिमी विज्ञान, तंत्रज्ञान आणि वैभव यांनी नेहरू इतके भारून गेले होते की, असेच उद्योगधंदे हिंदुस्थानात उभे झाले म्हणजे प्रगती अशी त्यांनी कल्पना झाली. पाश्चिमात्य देशात उद्योजकांचा एक प्रचंड समाज आहे. तो भारतात उपलब्ध नाही. मग उद्योजकाची भूमिका शासनास पार पाडावी लागेल. नेहरुंच्या समाजवादाचे खरे सूत्र एवढेच होते.

औद्योगिकीकरण म्हणजे प्रगती नव्हे, औद्योगिकीकरण हे प्रगतीचे एक लक्षण आहे. प्रगती विविध शैलींची असू शकते. स्वित्झर्लंड हे जगातील सर्वात श्रीमंत राष्ट्र आहे. त्या देशावर पाश्चिमात्य देशांचा मोठा प्रभाव आहे पण तरीही त्यांची एक वेगळी जीवनशैली आहे. विकासाचा काही एक बांधीव ठेका नाही, की एका ठिकाणी अमूक मार्गाने विकास झाला म्हणजे तोच मार्ग अवलंबला की दुसरीकडे आपोआप विकास सिद्ध होईल अशी काही प्रक्रिया नाही. विकास घडवून आणणे म्हणजे शाडूच्या मूर्ती तयार करणे नाही. विकास ही मोठी जिवंत प्रक्रिया आहे. प्रत्येक प्रदेशात, प्रत्येक समाजात इतिहासभूगोलाप्रमाणे विकास नवा मार्ग घेतो. गांधींचे अर्थशास्त्र मागासलेपणाचे नव्हते. गांधीजींच्या काळात आणि त्या नंतरच्याही ५०-१०० वर्षात समग्र देशाला अधिकाधिक वेगाने संकलित विकासाकडे घेऊन जाण्याचा तो शास्त्रशुद्ध आराखडा होता. औद्योगिकरण म्हणजे प्रगती नाही. समग्र समाजाच्या आर्थिक, सामाजिक स्वातंत्र्यकक्षा रुंदावण्याची प्रक्रिया म्हणजे विकास. औद्योगिकीकरण म्हणजे स्वातंत्र्याच्या कक्षा वाढवण्याचे प्रमुख साधन आहे हे खरे, पण साध्य नव्हे.

गांधीजींच्या सतत सान्निध्यात असलेल्या नेहरूंना हे समजण्यात अडचण का यावी? कारण नेहरू आणि ते प्रतिनिधीत्व करत असलेला समाज औद्योगिकरणाकरिता उतावळा झाला होता. गोरे गेल्यानंतर त्याची जागा पकडण्याची घाई त्या समाजाला झाली होती. नेहरूंच्या औद्योगिकरणाच्या संकल्पनेला पूर्वी एकदा मी "चैत्रगौरी" औद्योगिकरण असे नाव दिले आहे. चैत्रात शहरातील विशेषतः, ब्राह्मण समाजातील गृहिणी घरी हळदीकुंकवाचा समारंभ करतात. आलेल्या सुवासिनींना कैरीचे पन्हे आणि कैरीची डाळ हे दोनच पदार्थ द्यायचे असतात, घर श्रीमंताचे असो की गरिबाचे असो. मग अहमहमिका लागते ती गौरीच्या सजावटीची. गौर मखरात बसवली म्हणजे तिच्या भोवती सजावटीला काहीही ठेवले तरी चालते. घरात जे जे म्हणून दाखवण्यासारखे असेल, अगदी पोरांची खेळणीसुद्धा तेथे ठेवली जातात. शेजाऱ्यापाजाऱ्याकडून उसनवारी करूनसुद्धा शोभेच्या वस्तु गौर सजवण्यासाठी आणल्या जातात. वेगवेगळे उद्योगधंदे बाहेरून भारतात आणून इथली "चैत्रगौर" सजवण्याचा घाट नेहरूंनी घातला. पण गौर सजली म्हणजे काही घरात लक्ष्मी येते असे नाही.

शेतकऱ्यांच्या लुटीतून भांडवल निर्माण करावे. त्यातून परदेशी तंत्रज्ञान आणि यंत्रसामुग्री यांची आयात करावी. कोट्यावधी लोक बेरोजगार असताना मोठ्या भांडवली खर्चाचे व थोडे रोजगार देणारे उद्योगधंदे काढावे, या कारखान्यांनी तयार केलेला माल विकत घेण्याची देशातील बहुसंख्य हीनदीनांची ताकदच नसल्यामुळे कारखानेही संकटात यावेत, मग बळेच रडतराउतांना घोड्यावर बसवावे, त्यांनी केलेल्या मालाची निर्यात करायचा प्रयत्न करावा, म्हणजे परदेशातून आणलेल्या उधार- उसनवारांची थोडी तरी फेड करता येईल. एवढ्याने भागले नाही तर, नोटा छापून आणि परकीय कर्जे घेऊन का होईना देशातील उद्योगधंदे वाढवण्याची शर्थ नेहरूव्यवस्थेने केली. ही अशी अजागळ व्यवस्था निदान पन्नास वर्षे टिकलीच कशी हे एक मोठे आश्चर्यच आहे. याची तीन चार महत्त्वाची कारणे आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर विकसित राष्ट्रांमध्ये औद्योगिक क्रांतीची सुरुवात होत होती. ग्रहकोपयोगी वस्तू तयार करून खपवण्यापेक्षा ग्राहकोपयोगी वस्तू तयार करण्याचे कारखाने विकण्यात त्यांना जास्त स्वारस्य तयार झाले होते. औद्योगिकीकरणाच्या नावाने जिभल्या काढीत आलेल्या तिसऱ्या जगातील राष्ट्रांना हे जुने तंत्रज्ञान देऊन टाकण्यात त्यांची सोयच होती. जगातील शीतयुद्धाच्या तणावाने तिसऱ्या जगातील "नेहरू"ची स्थिती आणखी बळकट झाली. दोन महासत्तांमध्ये जीवघेणी स्पर्धा असल्याचा फायदा घेऊन भारतासारख्या देशांनी त्यांना असंतुष्ट करणे मोठे कठीण करून ठेवले. भारतात पेट्रोलजन्य पदार्थांचे साठे सापडत गेले याचा काही फायदा झालाच. लक्षावधी उच्चविद्याविभूषित आणि तंत्रकुशल भारतीय परदेशात गेले. खरे म्हणजे भारतीय अर्थव्यवस्थेवर हा मोठा आघात मानला गेला पाहिजे. पण या परदेशस्थ अनिवासी भारतीयांनी घरखर्चासाठी पाठवलेल्या पैशातूनही भारताची गंगाजळी बरी सावरली. १९८० साली आर्थिक संकट आलेच होते. पण पेट्रोलचे उत्पादन वाढल्यामुळे आणि मध्यपूर्वेतील अनिवासी भारतीयांनी पाठवलेल्या रकमांमुळे गंगाजळीची परिस्थिती चांगलीच सुधारली. परिस्थिती सुधारण्याची जुजबी कारणे कुणी लक्षात घेतली नाहीत. भारताच्या प्रगतीचे डंके वाजवले जाऊ लागले. परकीय चलनाची आपल्याला काही चिंताच नाही अशा थाटात कृत्रिम धागे आणि इलेक्ट्रॉनिक्स इत्यादी क्षेत्रात खुलेआम आयातीची धोरणे आखली गेली.

पण हा फुगा फुटणार होताच. फक्त वेळ यायची होती. या फुग्याला टाचणी लावायचे काम आखाती युद्धाने केले. आखाती युद्धामुळे पेट्रोलियम पुरवठ्यावर झालेला परिणाम आणि त्याबरोबर निवासी भारतीयांच्या धनादेशांवर झालेला परिणाम यामुळे आर्थिक संकट हा हा म्हणता समोर येऊन ठेपले. गेल्या दोन तीन वर्षात संकटाचे ढग भरून आले हे खरे. पण त्यांचा संबंध जनता दलाच्या शासनाशी नाही. संकट १९८० सालीच आले होते. त्याचवेळी इंदिरा गांधींना आंतरराष्ट्रीय नाणे निधीकडे धाव घ्यावी लागली होती. त्यावेळी जे आधार मिळाले ते आखाती युद्धाने क्रूरपणे काढून घेतले. शीतयुद्ध संपुष्टात आल्याने आता तिसऱ्या जगातील याचकांची मर्जी सांभाळण्याचे विकसित देशांना महत्त्वाचे वाटत नाही. पन्नास वर्षांनी का होईना "नेहरू अर्थशास्त्र" आज नागडे पडले आहे.

अर्थव्यवस्थेत आमूलाग्र बदल व्हायला पाहिजेत असे पंतप्रधान सांगतात, याकरिता

उपाययोजना करावी लागेल अशी घोषणा करतात. आणि हे सर्व बोलताना हे संकट म्हणजे काही सर्व राष्ट्रावर आलेले संकट आहे असे भासवतात. ते ज्यांना पूज्य मानतात त्या नेहरूंच्या पापांचे हे फलित आहे हे ते स्पष्ट करीत नाही.

त्यांचा नवा कार्यक्रम कोणता? पर्यायी अर्थशास्त्र शोधण्याकरिता त्यांना आंतरराष्ट्रीय नाणे निधीकडे पाहण्याची गरज नव्हती. शेतकरी आंदोलनाचे साहित्य त्यांनी चाळले असते तरी त्यांना पर्याय स्पष्ट दिसला असता. तो दिसला नाही. आज आंतरराष्ट्रीय नाणेनिधी नोकरशाहीवरील खर्च कमी करा म्हणून सांगतो, सूट सबसिड्या कमी करा म्हणून सांगतो, रुपयाचे अवमूल्यन करा म्हणून सांगतो, त्याला निदान मान तुकविण्याची तयारी दिसते. रुपयाचे अवमूल्यन झाले, नाही नाही म्हणत झाले. अर्थव्यवस्थेत मूलगामी बदल घडवून आणण्याचे जाहीर झाले आहे. पण यामागे काही मागील चुकांची जाणीव नाही. पश्चात्ताप तर नाहीच नाही. देशात परकीय चलनाचा तुटवडा झाला आहे, तर केवढा गहजब माजला आहे. कर्जाच्या व्याजाची रक्कम आणि भांडवलाची परतफेड एखादे वर्षी झाली नाही तर भारताची आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा कमी होईल असे गंभीर चेहरे करून म्हटले जाते. पण ही प्रतिष्ठा कमी झाल्यामुळे कोट्यावधी जनसामान्यांच्या आयुष्यात तिनकही फरक पडणार नाही. पण, प्रश्न राष्ट्रीय प्रतिष्ठेचा नाही, काही थोड्यांच्या सोयीचा आहे हे उघड आहे.

देशात जवळ जवळ चार कोटी लोक बेकार म्हणून नोंदणी झालेले आहेत. निरक्षरांची संख्या वाढत आहे. उच्चशिक्षित परदेशात निघून जाताहेत. शेतीची एकूण अवस्था अशी की, तमाम शेतकरी कर्जात बुडून चालला आहे. दरवर्षी ५० हजार कोटी रुपयांचा काळा पैसा तयार होतो याबद्दल कुणी जिवाच्या आकांताने बोलले नाही. ५ कोटी लोकांची बेकारी यांना गंभीर वाटली नाही. अर्थव्यवस्थेत आमूलाग्र बदल करण्याची भाषा ज्यांनी बेकारी हटवण्याकरिता वापरली नाही तेच ही भाषा गंगाजळीची समस्या तयार झाल्यावर वापरतात यातच खरी "ग्यानबाची मेख" आहे.

"इंडिया" वाद्यांना पश्चात्तापही झालेला नाही. कोणताही आमूलाग्र बदल करण्याची त्यांची इच्छा नाही. आजचे गंगाजळीचे संकट टाळायला दुसरा मार्ग नाही. म्हणून ते आज काहीही कबूल करायला तयार आहेत. आताची वेळ कशीबशी मारून नेली म्हणजे उद्या आपण पुन्हा मनमानी करायला मोकळे होऊन जाऊ हाच त्यांच्या मनातला विचार आहे.

आर्थिक ढाचा मुळापासून बदलला पाहिजे अशी भाषा आज कोण करतो आहे? असे बोलणारा प्रत्येक अर्थशास्त्री नेहरू-अर्थव्यवस्थेला हातभार लावणारा होता. आज त्याना उपरती झाली कोठून? हे अर्थशास्त्रज्ञ इंग्रजी पुस्तके वाचून शिकलेले, देशाच्या बटाट्याच्या बाजारपेठेचीसुद्धा माहिती नसलेले. बहुतेक सगळे पगारी चाकर. त्यामुळे शेतीच्या लुटीत सर्वांनाच स्वारस्य. त्याकरिता आवश्यक तो सगळा बौद्धिक अप्रामाणिकपणासुद्धा करण्याची तयारी. नेहरूअर्थव्यवस्थेवर त्यांचे विशेष प्रेम. कारण त्या अर्थव्यवस्थेने अर्थशास्त्रातील पदवीधरांना नोकऱ्यांची मोठी संधी उपलब्ध करून दिली. यातलीच काही मंडळी आता अर्थव्यवस्थेत आमूलाग्र बदल घडवून आणण्याच्या कामास लागली आहे. हे दृश्य पाहूनसुद्धा, त्याचे परिणाम भयानक नसते तर, हसू आले असते.

आजच्या परिस्थितीत खरेखुरे अर्थशास्त्र सांगणारा पंडीत मला कुणी दिसत नाही. प्रसिद्ध हिंदी साहित्यकार प्रेमचंद आज आपल्यात नाहीत. माझ्या हाती असते तर प्रेमचंदांना अर्थमंत्री बनवले असते. प्रेमचंदांची एक गोष्ट आहे. एक जुने खानदानी घराणे बाप मेल्यावर अगदी रसातळाला जाते. मागे राहिलेल्या भावाभावांना काम करणे ही कल्पना सहन न होण्यासारखी. मग त्यांनी जगावे कसे? परसदारात एक शेवग्याचे झाड होते. खूप शेंगा देणारे. त्याच्या शेंगा काढून दिवस उजाडायच्या आत गुपचूप बाजारात पाठवायच्या आणि आलेल्या पैशावर कसेबसे दिवस काढायचे. हे असे काही काळ चालले. एक दिवस वडिलांचे एक जुने मित्र पाहुणे म्हणून आले. त्यांचे आदरातिथ्य भावांनी कसोशीने केले, पण या पाहुण्याच्या लक्षात आले की, ह्या शेवग्याच्या झाडाच्या आधाराने सगळे कुटुंब अपंग बनले आहे. जाण्यापूर्वी पहाटेच्या अंधारात त्याने शेवग्याचे झाड तोडून टाकले व तो गुपचूप निघून गेला. सकाळी झाड पडलेले पाहून सर्व भावांनी पाहुण्यास खूप शिव्या दिल्या. काही दिवस उपास काढले, आणि शेवटी काहीच इलाज चालेना तेव्हा काम धंद्यास लागले. त्यांची लवकरच भरभराट झाली आणि मग त्यांच्या लक्षात आले की, शेवग्याचे झाड पाडणाऱ्या त्या निर्दयी पाहुण्याने त्यांच्यावर खरोखर खूप मोठे उपकार केले होते.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि इतर धनी संस्था आमची शेवग्याची झाडे झाली आहेत. कोणत्याही अटीवर कितीही कर्ज घेतले, अगदी बिनव्याज जरी कर्ज मिळाले तरी भारत कर्जमुक्त होऊ शकत नाही कारण आमच्या अर्थव्यवस्थेचा सगळा भर आडगिऱ्हाईकी तंत्रज्ञानाने चालणाऱ्या उद्योगधंद्यांवर आहे. हे कारखानदार कसली निर्यात करणार? अर्थव्यवस्थेचा ढाचा संपूर्ण बदलल्याखेरीज निर्यात वाढणार नाही. आणि निर्यात ताबडतोब मोठ्या प्रमाणावर दीर्घकाळ वाढत राहीली नाही तर कर्ज फिटण्याची काहीही शक्यता नाही. नाणेनिधीकडून कर्ज घ्यायचे असेल तर अवश्य घ्या पण, कर्ज घेतल्यामुळे प्रश्न सुटेल ही कल्पना खोटी.

अर्थव्यवस्थेमध्ये परिपूर्ण बदल घडवून आणायचा आहे, कठोर उपाययोजना करावी लागेल असे बोलणारी नेतेमंडळी आणि अर्थशास्त्री शेवग्याच्याच झाडाला शेंगा जास्त कशा येतील याचीच उपाययोजना सांगणार आहेत. कुणी त्याला खतपाणी करा म्हणेल.

त्यासाठी पोटाला चिमटा घेण्याची गरज आहे असे सांगेल. कुणी झाडाची छाटणी करायला पाहिजे म्हणजे उद्या भरपूर शेंगा येतील, पण पुन्हा फुटवे येईपर्यंत पोट आवळले पाहिजे असे म्हणेल. नेहरू- पठडीतले नेते आणि नेहरूतबेल्यातील अर्थशास्त्री या पलिकडे जाऊ शकणार नाहीत. या शेवग्याच्या झाडाच्या मोहातून सुटून बाहेर पडण्याइतकी मानसिक ताकद आज कोणातच राहिलेला दिसत नाही. कुणी उदारबुद्धी निर्दयपणे आता या व्यवस्थेपासून तोडून काढेल तर त्याचे मोठे उपकार होतील.

आजची परिस्थिती पाहून मला माझ्या एका जुन्या अनुभवाची आठवण येते. मी प्रशासकीय सेवेत असताना माझ्या हाताखाली एक चतुर्थ श्रेणीचा कामगार होता. काम चांगले करायचा. इतर काही वाईट व्यसने नाहीत. वागणुकीने सुजन. त्याच्यात फक्त एक दोष होता. दर शनिवारी महालक्ष्मीला जाऊन घोड्याच्या शर्यतीवर पैसे लावल्याखेरीज त्याला राहवत नसे. त्याची खात्री होती की, कितीही काबाडकष्ट केले तरी त्याची परिस्थिती सुधारणार नाही. घोड्याच्या शर्यतीवर एखादेवेळेस चांगले पैसे लागले तरच काही आशा आहे. त्याची बायको बिचारी मोलमजुरी करून संसार चालवी. घोड्यावर लावण्याकरिता तो तिचेही पैसे काढून घेई. उसनवारी करी. बोलायला गोड असल्यामुळे त्याला उसने पैसे मिळतही सहज. अगदी "बुकी"सुद्धा त्याचे खाते चालू ठेवीत. त्याची बायको बिचारी सगळ्या देणेदारांकडे जाऊन विनवणी करी की माझ्या नवऱ्याला नवे कर्ज देऊ नका आणि जुने कर्ज परत मिळण्यासाठी तगादा लावा. तिचे कृत्य तसे पतीद्रोही, पण हळूहळू त्यामुळे तिच्या नवऱ्याला कर्ज मिळायचे थांबून गेले. सुदैवाने तो काही पैसे मिळवण्यासाठी वाईट मार्गाला लागला नाही आणि त्यांची परिस्थिती थोडीफार सुधारली. मला शक्यता असती तर मीही आंतरराष्ट्रीय नाणे निधी आणि इतर धनकोंना जाऊन हात जोडून विनंती केली असती की नवे कर्ज देऊ नका आणि जुन्या कर्जांचा तगादा लावा. म्हणजे बांडगुळांचे अर्थकारण आपोआप संपेल. आणि उत्पादकांची शान वाढेल. पण असे काही होणार नाही. "इंडिया" वाल्यांना कर्जाची जितकी आवश्यकता आहे, तितकीच धनकोंना भारतातील "नेहरूवादी" व्यवस्था जरूरीची आहे. त्या अवस्थेत बदल घडवून आणण्याचा त्यांचा आग्रह काही, देशाच्या हिताच्या तळमळीपोटी आहे असे नाही. पण एवढे नक्की की शेवग्याचे झाड तोडायचे काम कुणाला तरी करावे लागणार आहे.

●●●●●

## शेतकरी संघटक

**शरद जोशी, शेतकरी आणि शेतकरी कार्यकर्ते यांच्या संपर्काचा दुवा. एका बाजूने संपर्क चालू आहे. वाचकांनी आपल्या प्रतिक्रिया, मतमतांतरे कळवून संपर्काचा आपल्या बाजूकडील प्रवाह मोकळा करावा.**

**— संपादक**

# बांधावरील पत्रव्यवहार

***त्यांचे पाप त्यांच्या पदरात घालायला पुन्हा कंबर कसावी लागणार***

**मा. शरद जोशी**

**स. न. वि. वि.**

६ जुलैचा शेतकरी संघटक हाती आला आणि 'हे पाप तुमचे आहे' हा लेख वाचला. आणि प्रतिक्रिया लिहावीशी वाटली. तुमच्यावर माझी नितांत श्रद्धा आहे. त्याचे कारण तुमचे निरपेक्ष विचार व त्याग. तुम्ही समाजवाद, साम्यवादाची चिरफाड केली आहे. धर्मनिरपेक्ष मानवनिष्ठा बनवली आहे. शेतकरी माध्यम धरून नियोजनाला शोषणमुक्त करण्याचा तुमचा विचार मला पटला आहे. नेहरुनीतीचे तुम्ही वस्त्रहरण केले आहे. कर्जाने भारत दुबळा बनला नसून तो शेतकऱ्यांच्या शोषणाने कर्जबाजारी बनला आहे. नवे शासन नेहरुनीती, योजना सोडणार की पुन्हा त्याच नेहरूनीतीला रेटीत नेणार हा प्रश्नच आहे. परंतु माझे अल्पमताने वाटते की नवे राज्यकर्ते नवा रस्ता धरण्यास अद्याप मानसिक तयारीत नाहीत. त्यांना शेतकरीशक्तीचा दबाव हवा आहे. शेतकरी व मजुरांचा दबाव निर्माण करण्यासाठी पुन्हा एकदा कंबर कसावी लागणार आहे. शेतकरी संघटना पुन्हा नव्याने उभी करावी लागणार आहे. जुने कार्यकर्ते कितपत उपयोगी पडतील ही शंकाच आहे. नवे केडर निर्माण करावे लागेल. मुक्तीची जिद्द असलेला नवा संच उभा राहिला पाहिजे तर यश येईल.

हे पत्र म्हणजे लहान तोंडी मोठी घास, पण राहावले नाही. क्षमस्व.

आपला,

**देवराम अंभुरे**

गणेशनगर. जि. अहमदनगर

दि. ८/७/९१

## झेंडा लुटला गेला

फुटक्या पाटीवर
गणकयंत्राचा परिचय लिहितांना,
फाटक्या इतिहासात
नेहरूंचे वैभव वाचतांना,
पोटात भुकेचा डोंब उठला
अन् गांधीबाबाचा
ग्रामस्वराज्याचा झेंडा
फडकण्याआधीच लुटला गेला

**— बब्रुवाहन रक्षाळे**

वाकली, जि. लातूर

# राष्ट्रीय कृषिनीती

## लेखांक ३

## जीवनाधार कार्यक्रम अभियान धरती

**जमीन**

४३. भारतातील सुमारे २६ कोटी ४० लाख हेक्टर जमीन, म्हणजे १९५१ च्या आकडेवारीनुसार दरडोई सुमारे अर्धा हेक्टर जमीन काही जैविक क्षमतेची आहे. या पैकी, १५ कोटी ३० लाख हेक्टर जमीन मातीची धूप झाल्यामुळे आणि आणखी २ कोटी २० लाख हेक्टर जमीन पाणथळ व खारावलेली झाल्यामुळे निकृष्ठ प्रतीची बनली आहे. या १७ कोटी ५० लाख हेक्टर निकृष्ठ जमिनीपैकी ९ कोटी हेक्टर जमीन इतकी हलकी बनली आहे की तिची कसणूक करून काही हाती पडणे अशक्य आहे. उरलेली ८ कोटी ५० लाख हेक्टर जमीनही त्याच मार्गावर आहे. या गतीने, २००० सालापर्यंत दरडोई जमिनीचा आकार १४ आर पर्यंत खाली आलेला असेल.

४४. विस्तारणाऱ्या वाळवंटांना थोपवून किंवा समुद्र, दलदली हटवून थोडी फार नवीन जमीन लागवडीखाली येऊ शकेल पण एरवी लागवडीयोग्य नवीन जमीन तयार करणे अशक्य आहे. किंबहुना, 'अधिक धान्य पिकवा', मोहिमेच्या भरात उत्पादनक्षमता, नैसर्गिक रचना, पाण्याची सोय यांच्या दृष्टीने शेतीस अयोग्य भूमीवर तसेच गायराने व जंगले यांच्यावरसुद्धा मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण झाले आहे. वनक्षेत्र म्हणून अधिकृतरित्या घोषित झालेल्या ६ कोटी ७० लाख हेक्टर जमिनीपैकी फार फार तर २ कोटी ५० लाख हेक्टर जमीन "वनक्षेत्र" म्हणण्यायोग्य आहे.

४५. अमर्याद जंगलतोडीमुळे आणि जमीन उघडीबोडकी झाल्यामुळे पुरांच्या लोंढ्याबरोबर पाणी प्रचंड प्रमाणावर वाहून तर जातेच पण त्याचबरोबर जमिनीवरील मातीचीही मोठ्या प्रमाणावर धूप होते व भयंकर प्रमाणात जीवित व वित्त हानी होते. मर्यादित असलेल्या भूक्षेत्राची ही हानी जर थांबवायची असेल तर निसर्गाचा काही भाग तरी अतिक्रमणातून सोडवून गायराने व जंगलांखाली आणणे आवश्यक आहे. जमिनीचा पोत जास्तीत जास्त टिकून राहावा या साठी अधूनमधून जमीन पड ठेवणे आणि पिकांचे फेरपालट अशा पारंपरिक पद्धतींचा पुन्हा अवलंब करावा लागेल. लागवडीखाली असलेल्या जमिनीपैकी एक तृतियांश जमीन येत्या वीस वर्षांत शेतीतून मुक्त व्हावी यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

**वनीकरण**

४६. आज राबविला जाणारा वनीकरणाचा अत्यंत खर्चिक कार्यक्रम हा भूक्षेत्राच्या हानीच्या वेगाच्या तुलनेत अत्यंत तोटका आहे. जंगलांच्या नैसर्गिक पुनरूज्जीवनाला वाव देऊन सफल मृद्संधारण आणि जलसंरक्षणाच्या कार्यक्रमांची त्याला जोड दिली आणि चराई व अतिक्रमणापासून त्यांचे संरक्षण केले तर परिस्थितीत सुधार होण्याची काही आशा आहे. ग्रामीण विकासाच्या कार्यक्रमांतील हा सर्वांत महत्त्वाचा कार्यक्रम मानून त्यात स्थानिक जनतेचा आणि प्रशासनाचा प्रत्यक्ष सहभाग तसेच रोजगार हमी, दारिद्र्य निर्मूलन इत्यादी नावांनी वाया घालवला जाणारा निधी पूर्णपणे या कार्यक्रमाकडे वळविणे आवश्यक आहे. नवीन लागवड करतांना एकाच जातीची झाडे न लावता सरपण, इमारती लाकूड, विविध फळफळावळ देणाऱ्या तसेच वेगवेगळ्या उंचीच्या व मुळांचा विस्तार कमी जास्त असलेल्या झाडांची योग्य प्रमाणात लागवड होईल याची काळजी घेतली पाहिजे. खनिज तेल व इतर ऊर्जास्रोतांच्या संभाव्य टंचाईमुळे भविष्यकाळात ऊर्जेसाठी या जंगलांवरच विसंबून राहावे लागणार आहे हे

**शरद जोशीकृत राष्ट्रीय कृषिनीतीच्या मराठी भाषांतराचा हा तिसरा लेखांक आहे.**

**पहिल्या दोन लेखांकांमध्ये राष्ट्रीय कृषिनीतीची प्रस्तावना केली असून त्यामध्ये स्वातंत्र्यानंतर देशामध्ये अवलंबिलेल्या अर्थव्यवस्थेचे विश्लेषण केले आहे. देशाच्या आजच्या अर्थिक व सामाजिक दुःस्थितीला, विकासाच्या नावाखाली शेतीला डावलूनच नव्हे तर तिची क्रूरपणे लूट करून राबविलेले औद्योगिकीकरणाचे धोरण कसे कारणीभूत आहे याचे विश्लेषण या प्रस्तावनेत केलेले आहे.**

**प्रस्तावनेच्या दुसऱ्या भागात राष्ट्रीय कृषिनीतीची आवश्यकता, औचित्य व त्यापुढील आव्हानांचे विश्लेषण करून येत्या २० वर्षांत साधावयाची उद्दिष्टे मांडली आहेत.**

**दुसऱ्या लेखांकाच्या उत्तरार्धात राष्ट्रीय कृषिनीतीच्या दृष्टीने येत्या दोन दशकांत अंमलात आणावयाच्या कार्यक्रमांचा आराखडा दिलेला आहे. ही अंमलबजावणी अभियान 'धरती' व अभियान 'रयत' अशा दोन आघाड्यांवर करावयाची आहे.**

**शेतीक्षेत्राचा विकास साधणे, देशाची बिघडलेली आर्थिक, भौगोलिक, पर्यावरणविषयक स्थिती सावरणे यासाठी शेतीची जीवनाधार व्यवस्था, संरचना व शेतीसाठी लागणारी साधनसामुग्री तसेच शेतीव्यवसाय याबाबतीत कोणकोणती धोरणे कशी कशी आखली जातील आणि अंमलात आणली जातील योच विवेचन या तिसऱ्या लेखांकात केले आहे.**

**(ही राष्ट्रीय कृषिनीती मुळात NATIONAL AGRICULTURAL POLICY या नावाने इंग्रजीमध्ये असून तिचे मराठीकरण श्री. गोपाळराव परांजपे, पुणे यांनी केले आहे.)**

लक्षात घेऊन तितक्या मोठ्या प्रमाणावर वनीकरणाचा हा कार्यक्रम हाती घेतला पाहिजे.

## मृद्संधारण

४७. सुमारे ८ कोटी ५० लाख हेक्टर जमीन सुधारण्याकडे गांभीर्याने लक्ष पुरवायला हवे. कमी खोलीच्या व जास्त उताराच्या जमिनींवर कुरणे व जंगले वाढवावी लागतील आणि उरलेल्या लागवडीयोग्य जमिनीला सपाटीकरण, बांधबंदिस्ती आणि निचरा व्यवस्था करून आणखी हानीपासून वाचवावे लागेल.

४८. अशा प्रकारचे व्यापक कार्यक्रम स्थानिक समाजाच्या उत्स्फूर्त सहभागाविना केंद्र शासनाच्या कोणत्याही योजनेच्या आवाक्याबाहेरचे असतात. मृद्संधारणाच्या या व्यापक कार्यक्रमात शासनाने कर्त्याऐवजी प्रोत्साहक व साहाय्यक करवित्याची भूमिका घेतली पाहिजे.

४९. अनियंत्रित पंचमहाभूतांसमोर राष्ट्राच्या भूसंपत्तीची सातत्याने झीज होत चालली आहे. कृषिक्षेत्राकडे गेल्या अनेक दशकांत जे दुर्लक्ष केले गेले त्याचा सर्वात भयंकर परिणाम म्हणजे जमिनीची ही झीज आहे. वाळवंटाचे आक्रमण थांबविणे एवढेच नव्हे त्याची पीछेहाट करणे, तसेच महापूर व समुद्राच्या वादळी भरतीच्या लाटांमुळे नासधूस झालेल्या जमिनीला संरक्षण देणे यासाठी अग्रक्रमाने सर्वंकष कार्यक्रम राष्ट्रीय पातळीवर राबविले पाहिजेत. वनीकरण, पाणलोट क्षेत्रांचे नियोजन, बांधबंदिस्ती, जमीन सपाटीकरण, जलनिःसारण, जमिनी क्षारमुक्त करणे या करिता विभागीय तसेच स्थानिक पातळ्यांवर प्रकल्प सुरू करणे आवश्यक आहे. जमिनीची उत्पादकता वाढविण्यासाठीच असे नाही पण तिचा पुढील ऱ्हास थांबविण्याकरिता हे प्रकल्प आवश्यक आहेत.

## पावसावरील शेती

५०. भारतातील बहुसंख्य शेतकऱ्यांची उपजीविका पावसाळी शेतीवर अवलंबून आहे. त्यामुळे या शेतीची उत्पादकता वाढविण्याचे प्रयत्न करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. पावसाचे पाणी अडवणे, आणि त्याचा साठा करून त्याचा कार्यक्षम वावराचे व्यवस्थापन करणे याने कोट्यावधी शेतकऱ्यांचे भवितव्य आशादायक बनू शकेल. हे करीत असतांना एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की पावसाच्या पाण्यावरील या जमिनी, दीर्घकालीन दृष्ट्या, जंगले, फळबागा किंवा कुरणांखाली आणल्यास तुलनेने त्या अधिक फायद्याच्या ठरू शकतात.

## हवामानानुसार विभागांचा विकास

५१. वेगवेगळ्या विभागांचा विकास करतांना प्रत्येक विभागाच्या भौगोलिक वैशिष्ट्यानुसार गरजांचा विचार करून वेगवेगळी धोरणे अवलंबणे आवश्यक आहे. डोंगराळ प्रदेश, किनारपट्टीचे प्रदेश, वाळवंटी क्षेत्रे, अतिवृष्टीचे विभाग यांच्या विकासासाठी अभ्यासपूर्वक बेतलेले कार्यक्रम आवश्यक आहेत. एखादा कार्यक्रम एखाद्या भागात यशस्वी झाला म्हणूनच केवळ, तो तसाच दुसऱ्या भागांमध्ये राबविण्याचा मोह टाळला पाहिजे. वायव्येच्या राज्यांत हरित क्रांती पुष्कळ अंशी यशस्वी झाली असली तरी तो नमुना पावसाच्या इतर विभागांत लागू पडेलच असे नाही. हरित क्रांतीमुळे आपल्याला थोडी श्वास घ्यायला उसंत मिळाली आहे. या संधीचा वापर करून आपल्याला नवीन वाटा शोधायला हव्यात, पेट्रोलियमजन्य सामुग्रीच्या संभाव्य तुटवड्यामुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीशी सामना करण्याची तयारी करायला हवी. 'हरित क्रांती'च्या तंत्रज्ञानाच्या अंगभूत गुणधर्मानेच निर्माण झालेले आरोग्य व पर्यावरणासंबंधीचे धोके कमी करणेही आवश्यक आहे. भारताच्या पूर्व व ईशान्य विभागातील हिरवे पट्टे नवीन तंत्रज्ञान शोधण्यासाठी व त्याची उपयुक्तता तपासण्यासाठी उत्तम प्रयोगक्षेत्रे ठरू शकतील.

## जमिनीचे फेरवाटप व एकत्रीकरण

५२. कमाल जमीनधारणा कायदा अधिक कडक करण्याला व जमिनीचे फेरवाटप करण्याला आता काही फारसा वाव उरलेला नाही. काही धार्मिक संस्था आणि राजकीय वरचष्मा असलेल्या व्यक्तींची प्रकरणे वगळता कायद्यातील कमाल मर्यादेपेक्षा जास्त असलेली जमीन लपवून ठेवण्याच्या क्लृप्त्या काळाबरोबर संपुष्टात आल्या. वस्तुस्थिती अशी आहे की कमाल जमीन-धारणेच्या कायद्यामुळे आजपर्यंत शेतकऱ्यांच्या, विशेषतः शेतकरी स्त्रियांच्या मूलभूत हक्कांची गळचेपी झाली आहे. तशी गळचेपी बिगरशेती क्षेत्रांत करण्याचा विचारही अशक्य आहे. कायद्याने जास्तीत जास्त जितकी शेतजमीन ठेवता येते तिची किंमत एखाद्या शहरातील मध्यम आकाराच्या फ्लॅटच्या किंमतीपेक्षा कितीतरी कमी असते आणि जास्तीत जास्त अनुकूल परिस्थितीत या जमिनीतून येणारे उत्पन्न कनिष्ठ दर्जाच्या अधिकाऱ्याच्या पगारापेक्षाही कमी असते.

५३. कमाल जमीनधारणेचा प्रचलित कायदा अधिक परिणामकारक रीतीने अंमलात आणण्यास तसा बराचसा वाव आहे. पण, ही अंमलबजावणी करावयाची असेल किंवा जमीन धारणेची कमाल मर्यादा अजून खाली आणायची असेल तर उत्पन्न व संपत्ती यांचे न्याय्य व समान वाटप करण्याची भावना राष्ट्र पातळीवर निर्माण झाली पाहिजे. यासाठी बिगरशेतीक्षेत्रातसुद्धा अशाच मर्यादा लादाव्या लागतील. तसेच, या पुढे तरी मालमत्तेमध्ये मुलींना मुलांप्रमाणेच वाटा मिळेल अशा तऱ्हेचे बदल प्रचलित कायद्यांमध्ये करणे आवश्यक आहे.

५४. ठराविक कालांतराने करावयाची जमिनीच्या खात्यांच्या पुनर्सर्वेक्षणाची कामे देशाच्या बऱ्याच भागात तुंबून पडली आहेत. १९९१ मध्ये होणाऱ्या जनगणनेच्या कामाबरोबरच हे काम करून घेतले तर ते उपयुक्त ठरेल. जमिनीसंबंधीच्या नोंदी ठेवण्यासाठी संगणकाचा वापर करावा म्हणजे स्थानिक नोकरशाहीच्या भ्रष्टाचारावर मात करून अतिरिक्त जमिनीची छुपी मालकी उघडकीस आणणे शक्य होईल. कमाल जमीनधारणा कायदा धाब्यावर बसवून अधिक जमीन बाळगणाऱ्यांना आपल्याकडील अतिरिक्त जमीन घोषित करण्याची अजून एक संधी द्यावी. पण त्यानंतरही कुणाकडे अतिरिक्त जमीन लपवून ठेवलेली आढळल्यास ती जमीन कोणत्याही प्रकारे नुकसानभरपाई न देता जप्त करावी. अशा तऱ्हेने जप्त झालेल्या जमिनी प्राधान्याने पंचायत राज्य संस्थांकडे त्यांच्या उत्पन्नासाठी आणि रोजगारनिर्मिती करण्यासाठी सोपविण्यात याव्यात. अतिरिक्त जमीनीपैकी ज्या प्रकरणांत जमिनीची मालकी व्यक्तींना देता येत असेल आणि भविष्यातसुद्धा जमीनींच्या मालकीबद्दल शासकीय फेरफार करण्याची वेळ आली तर तसे फेरफार कुटुंबातील पुरुष सदस्यांऐवजी स्त्रीसदस्यांच्या नावे करावेत. जमिनीच्या मालकीची नोंद पतीपत्नीच्या संयुक्त नावाने करण्याचा कायदा झाला तर तो ग्रामीण समाजजीवनात गुणात्मक सुधारणेची दारे खुली करणारा ठरेल.

५५. जमिनीच्या तुकड्यांचे एकत्रीकरण करणे व काही मर्यादेपलिकडे जमिनीचे तुकडे होऊ न देणे यासाठी तसा कायदा असण्याची आणि

त्याची परिणामकारी अंमलबजावणी होण्याची नितांत आवश्यकता निर्माण झाली आहे. जमिनीच्या तुकड्यांच्या एकत्रीकरणाचे काम ग्रामपंचायतींच्या मदतीने उत्तम प्रकारे होऊ शकेल. सुरुवातीला, ओलिताची एक एकर आणि कोरडवाहू तीन एकर म्हणजे कार्यक्षम आकाराचे खाते अशी किमान मर्यादा बांधून द्यावी. ही मर्यादा टप्प्याटप्प्याने अशा तऱ्हेने वाढवावी की २०१० सालापर्यंत त्यावेळच्या किमान आकाराच्या खातेदाराचे वार्षिक उत्पन्न केंद्र शासनातील सर्वात खालच्या स्तरातील कर्मचाऱ्याच्या वार्षिक उत्पन्नाइतकेतरी असेल. विशेष आर्थिक प्रोत्साहने व प्रशासकीय सुविधा उपलब्ध करून, निदान कसणुकीसाठी का होईना, शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीच्या तुकड्यांचे एकत्रीकरण करण्यास प्रेरित करावे लागेल.

## भूसंपादन

५६. मोठी शहरे आणि महानगरे यांच्या सीमांवरील शेतकऱ्यांना एका गंभीर समस्येला तोंड द्यावे लागत आहे. शहरांच्या विस्तारासाठी त्यांच्या जमिनी ताब्यात घेतल्या जात आहेत. या जमिनी सामान्यतः कमीत कमी किंमत देऊन ताब्यात घेतल्या जातात. या जमिनींची थोडीफार सुधारणा केल्यानंतर त्यांना भरमसाठ किंमती मिळतात. ज्या शेतकऱ्याला आपले हे उपजीविकेचे साधन सोडणे भाग पाडले जाते, त्याला जमिनीच्या मिळालेल्या तुटपुंज्या किंमतीतून नवा उद्योगव्यवसाय सुरू करणे मुश्किल होऊन बसते. यापुढे, जमिनीमधून उत्पादन काढीत असलेल्या शेतकऱ्याला आपली जमीन सोडण्यास भाग पाडले जाणार नाही असे धोरण राहील. शेतकरी जी जमीन कशीत नसतील त्या जमिनींचा विकास करून संबंधित नगर विकास अधिकाऱ्याने मंजूर केलेल्या योजना व आराखड्यानुसार प्लॉट पाडण्याची व नंतर ते खुल्या बाजारभावाने विकण्याची परवानगी अशा जमिनींच्या मालकांना देण्यात येईल. अशा तऱ्हेने जमिनीचा विकास करणे शेतकऱ्याच्या कुवतीबाहेर असेल तर त्याला विकासखर्च वजा जाता विकसित जमिनीच्या किंमतीच्या जवळपास किंमत मिळाली पाहिजे.

## सिंचन

५७. जलसिंचन व्यवस्था सुधारण्याच्या प्रयत्नांमध्ये आजपर्यंत विशेषतः मोठमोठी धरणे आणि कालव्यांचे जाळे अशा भूपृष्ठावरील कार्यक्रमांवरच भर दिला गेला. गेल्या ४० वर्षांत २५००० कोटी रुपयांहून अधिक रक्कम खर्च करून मोठ्या प्रकल्पांच्या साहाय्याने १ कोटी ६० लाख हेक्टर जमीन ओलिताखाली आणली गेली. भूपृष्ठावरील सिंचनव्यवस्थेचे २६५ मोठे प्रकल्प १९५१ पासून हाती घेण्यात आले. पण प्रत्यक्षात त्यांपैकी फक्त ६५ प्रकल्प पूर्ण झाले. त्यातही, बहुतेक प्रकरणीं जमिनीची धूप थांबविण्यासाठी, केलेले उपाय परिणामकारक ठरले नाहीत व धरणांच्या लाभक्षेत्रातील जलनिःसारणाची व्यवस्था दुर्लक्षित राहिली. अशा तऱ्हेने तयार झालेल्या सिंचनक्षमतेपैकी जवळजवळ २५ टक्के म्हणजे सुमारे ६० लाख हेक्टर जमिनीला पुरेल इतकी सिंचनक्षमता उपयोगातच आणली गेली नाही. इतकी सिंचनक्षमता पुन्हा नव्याने तयार करावयाची ठरविली तर १९५१ सालापासून सिंचनासाठी जितकी गुंतवणूक केली गेली तितकीच आणखी गुंतवणूक करावी लागेल. सिंचित जमिनीतून दर हेक्टरी ४ ते ५ टन उत्पादन निघावे अशी अपेक्षा असते, प्रत्यक्षात मात्र अशा जमिनीतून ते १.७ टनापेक्षा जास्त क्वचितच मिळते. भूपृष्ठीय जलसिंचनाचे दुष्परिणाम आता लक्षात येऊ लागले आहेत; पूर्वी सुपीक असलेली सुमारे ७० लाख हेक्टर जमीन अशा सिंचनामुळे पाणथळ बनली आहे आणि त्यामुळेच खारावूनही गेली आहे.

५८. मोठी धरणे आणि जलाशय यांना राष्ट्रीय जलव्यवस्थापनामध्ये विशेष महत्त्व आहे. ते नाकारण्याचा वरील विवेचनाचा उद्देश नाही. पण असे प्रकल्प केवळ ठोकळेबाजपणे उभे न करता पाणलोट क्षेत्र, तसेच धरणांची लाभक्षेत्रे यांचे व्यवस्थापन व प्रकल्प यांच्यात परस्परपूरक दृष्टिकोनातून नियोजन झाले पाहिजे.

५९. सुरू झालेले प्रकल्प आता बंद करता येणार नाहीत किंवा पुढेही ढकलता येणार नाहीत, कारण त्यामुळे त्यावर आतापर्यंत झालेला खर्च वाया जाऊन प्रचंड आर्थिक नुकसान होईल. पण, त्यांच्या पाणलोट क्षेत्रांत प्रकल्पांच्या कामाबरोबरीने वनीकरण करणे आणि भूसंधारणाची व्यवस्था करणे यादृष्टीने त्यांच्या कार्यक्रमाच्या रूपरेषेमध्ये काही बदल करणे आवश्यक आहे. या प्रकल्पांमुळे निर्माण झालेली सिंचनक्षमता व प्रत्यक्षात वापरात येणारी सिंचनक्षमता यांतील तफावत भरून काढणे, लाभक्षेत्रातील जलसिंचन पद्धतींमध्ये सुधारणा करणे तसेच इतर लघुजलसिंचन योजनांतील तलाव गाळाने भरण्यापासून वाचवणे, पाणथळ झालेल्या जमिनींचे पुनर्वसन करणे ही उद्दीष्टे डोळ्यासमोर ठेवून येती दहा वर्षे सिंचित क्षेत्रावर लक्ष केंद्रित करावे लागेल.

६०. जलसिंचनासंबंधी धोरण ठरवितांना आवश्यक असा सर्वांत महत्त्वाचा बदल म्हणजे भूगर्भातील पाणी हे जलसिंचनासाठी प्रमुख स्रोत आहे असे मानणे. या पाण्याच्या साहाय्याने केलेली सिंचनव्यवस्था शेतकऱ्याला आपलीशी वाटते, त्यात पाण्याची नासधूस कमी होते, ती प्रत्यक्ष खर्चात स्वस्त असते आणि तिच्यावरील सार्वजनिक (सामाजिक) खर्चही कमी असतो. ही पद्धती अधिक गतीने कार्यान्वित होते आणि उत्पादकतेच्या दृष्टीनेही अधिक समाधानकारक असते. यासाठी केंद्र आणि राज्य शासनांनी आपापल्या खात्यांमध्ये जमिनीमध्ये अधिकाधिक प्रमाणात पाणी मुरविण्याच्या प्रकल्पांना प्राधान्य दिले पाहिजे. राज्य शासनांनी भूगर्भातील पाण्यांच्या साठ्यांचा विस्तार, स्वरूप आणि ते पुन्हा पुन्हा भरले जाण्याची परिस्थिती या विषयी परिणामकारक नियोजनाच्या दृष्टीने पाहाणी करायला हवी. तसेच, विहिरी, पाईपलाईन, पंप या बाबतीत शेतकऱ्यांना तांत्रिक सल्ला देणे, वीजपुरवठा सेवेचा दर्जा सुधारणे, विजेचे दर कमी करणे, भूगर्भातील पाण्याच्या उपसा करण्याच्या योजनांना पतपुरवठा सहज उपलब्ध करणे, आणि अयशस्वी विहिरी व नलिका-विहिरींच्या खर्चाचा निम्मा बोजा आपल्यावर घेणे या गोष्टीसुद्धा शासनाने या कार्यक्रमाचा भाग म्हणून आपल्या शिरावर घेतल्या पाहिजेत. अशा तऱ्हेने देशाच्या सिंचन-नकाशा बऱ्याच अल्पकाळात मूलतः बदलता येईल.

## मानवी श्रमशक्ती

६१. भारतात सुमारे ५८ कोटी लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. त्यांच्या जमिनींचे वाढत्या वेगाने तुकडे पडत आलेले आहेत. त्यामुळे जमिनीच्या खात्यांचे सरासरी क्षेत्रफळ १.६८ एकरपर्यंत घसरले आहे. लहान शेतकऱ्यांचे प्रमाण १८ टक्के तर सीमांत शेतकऱ्यांचे प्रमाण सर्वांत जास्त म्हणजे ५८ टक्के आहे. अगदी लहान खाती सोडली तर इतर सर्वच गटांतील खात्यांची संख्या आणि त्यांचे सरासरी क्षेत्रफळ प्रत्यक्षात आणि तुलनात्मक दृष्टीनेही वर्षानुवर्षे घटत आले आहे. ७० टक्के शेतकरी पावसाळी शेतीवरच जगत असतात; म्हणजे वर्षातील सहा

महिने त्यांना करण्यासारखे काहीच काम नसते. मनुष्य-तासांच्या हिशोबात मांडायचे तर निम्मे शेतकरी वर्षभर बेरोजगारच असतात.

६२. शेतीक्षेत्रावरील लोकांचा हा भार लोकसंख्यावाढीमुळे नसून शेतीवर ज्यादा झालेली लोकसंख्या इतर क्षेत्रांमध्ये सामावून घेण्याच्या यंत्रणेच्या अपयशाचा तो परिणाम आहे. शेतीत तयार होणारी बचत शेतकऱ्याकडेच ठेवून त्यातून स्वयंरोजगाराची निर्मिती होऊ देणे हा ग्रामीण बेरोजगारीवरील दीर्घकालीन इलाज आहे. पण या जुनाट समस्येवर प्राथमिक उपाय म्हणून जलसिंचन, भूसंधारण, वनीकरण असे कार्यक्रम उपयुक्त ठरू शकतील. तसेच, काही व्यापक सार्वजनिक कामे सुरू करूनही बेरोजगारीच्या समस्येला हात घालता येऊ शकेल.

६३. शेतीक्षेत्रातील वर्षानुवर्षे अनुभवाला आलेल्या निराशाजनक परिस्थितीने शेतकऱ्याची उभारीच मारून टाकली आहे आणि त्यामुळे कोणत्याही नवीन प्रयत्नांकडे तो अविश्वासानेच पाहातो. विस्तार कार्यक्रमांनी ना शेतकऱ्यांचे समाधान झाले, ना कार्यक्रम राबविणाऱ्या कर्मचारी वर्गाचे. इतके असूनही, जे नवीन तंत्रज्ञान व पद्धती आर्थिकदृष्ट्या लाभदायक आहेत असे शेतकऱ्यांना पटले ते तंत्रज्ञान व पद्धती आत्मसात करण्याची अफाट क्षमता शेतकऱ्यांनी दाखविली. विस्तार कार्यक्रमामध्ये नवीन दिशा आणि व्याप्ती ठरवून सुधारणा करणे आवश्यक आहे. ज्या शेतकऱ्यांनी आपल्या शेतीत काही चांगली कामगिरी करून दाखविली आहे त्यांची शेते प्रयोगासाठी व आदर्श नमुने म्हणून वापरावीत. तरुण शेतकऱ्यांना प्रशिक्षण व भेट योजनेच्या अधिकाऱ्यांच्या वेतनाच्या तुलनेत विद्यावेतन देऊन खास पद्धतीने आखलेल्या दोन तीन महिन्यांच्या अभ्यासवर्गांमध्ये सहभागी होण्यास प्रोत्साहन द्यावे. त्यातून होतकरू व नवीन काही करण्याची क्षमता असणारांना त्यांच्या दृष्टी आणि कल्पकता यांचा विकास करण्याच्या दृष्टीने परदेशी पाठवावे. शेतकऱ्यांना केले जाणारे मार्गदर्शन कालमानानुरूप आणि विभागानुरूप असले पाहिजे. असे कालविभागप्रस्तुत मार्गदर्शन शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमांचा विस्तारकार्यक्रमाचे प्रमुख साधन म्हणून उपयोग झाला पाहिजे.

## बी-बियाणे

६४. उत्तम प्रतींच्या बी-बियाण्यांची गरज आणि आज त्यांची असलेली उणीव लक्षात घेऊन प्रत्येक गावात कृषिकेंद्रांसारख्या शेतीउपयोगी वस्तूंची विक्री करणाऱ्या संस्थांमार्फत शेतकऱ्यांना उत्तम दर्जाचे बियाणे उपलब्ध करून देण्याचा उपक्रम हाती घेतला पाहिजे. बी-बियाण्यांसाठी असलेल्या विविध अनुदान योजनांची फेरआखणी करून त्यासाठी उपलब्ध निधी बियाण्यांचे उत्पादन, त्यांच्या वितरणाच्या संस्था व केंद्रे यांना दीर्घकालीन बळकटी मिळेल अशा तऱ्हेने वापरण्यात यावा. उच्च दर्जाच्या बियाण्यांची आयात करणे, बियाणेउत्पादनात स्पर्धेला उत्तेजन देणे, बियाणे उत्पादनातील सार्वजनिक क्षेत्रांबरोबरच खाजगी क्षेत्रांनाही साहाय्य करणे यासाठी नवीन बियाणेविषयक धोरणातील कार्यकमांची अंमलबजावणी अधिक जोमने करण्यात येईल. शेतकऱ्यांनाचांगल्यात चांगली बियाणी (रास्त) स्पर्धात्मक दरांमध्ये उपलब्ध होण्याच्या दृष्टीने सार्वजनिक क्षेत्रांत व खाजगी क्षेत्रांतही संशोधनाचे उपक्रम सुरू करून त्यांना आर्थिक साहाय्य दिले जाईल.

६५. संकरित बियाण्यांचे उत्पादन व वापर यांकडे विशेष लक्ष पुरविले जाईल. पेशीविकास तंत्र व जैविक तंत्रज्ञान, विशेषः फळबागांसाठी जास्तीत जास्त वापरले जाईल. संकरित व इतर अधिक उत्पादक जातींच्या बियाण्यांवर भर देतांना देशातील विस्तृत अनुवंशिक वनस्पतीसृष्टी व प्राणीसृष्टीवर त्याचा विपरित परिणाम होणार नाही याचीही काळजी घेतली जाईल.

## खते आणि ऊर्जा

६६. शेतीउत्पादनांची जनतेची वाढती मागणी भागविण्याकरीता उत्पादन वाढविण्याच्या धोरणात खतांना अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. १९६५ पासून रासायनिक खते व पोषणद्रव्ये यांच्या वापरामध्ये प्रचंड गतीने वाढ झाली आहे. नत्र आणि फॉस्परस (स्फुरद) युक्त खतांच्या निर्मितीमध्ये आणि वापरामध्येसुद्धा आज भारत जगामध्ये चौथ्या क्रमांकावर आहे. १९८९-९० सालात भारतातील खतांचा वापर १ कोटी ७५ लाख टनांपर्यंत पोहोचला आहे. २० कोटी ५० लाख टन अन्नधान्य उत्पादनाचे लक्ष्य गाठण्याकरिता १९९४-९५ सालापर्यंत देशाची खताची गरज (पोषणद्रव्य म्हणून) १ कोटी ७५ लाख टनांपर्यंत वाढलेली असेल असा अंदाज आहे. नत्रयुक्त आणि फॉस्फरस (स्फुरद) युक्त खतांच्या निर्मितीमध्ये खनिज इंधन, गंधक, खनिज फॉस्फेट यांसारखा एकदा वापरला की संपणारा कच्चा माल वापरावा लागत असल्याने ती मोठ्या प्रमाणावर भांडवल व ऊर्जा खाणारी ठरते आणि त्यामुळेच, अशी निर्मिती अमर्याद काळपर्यंत चालेल असे गृहित धरून चालणार नाही. जमिनीला पोषणद्रव्य पुरविण्याची योजना आखतांना जगातील वेगाने संपत चाललेल्या खनिजतेलाच्या साठ्यांनी दाखविलेल्या धोक्याच्या दिव्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

६७. त्यामुळे, कृषिउत्पादनामध्ये खतांचा कार्यक्षम वापर हा आणीबाणीचा मुद्दा ठरतो. रासायनिक खतांचा वापर जास्तीत जास्त लाभदायक आणि कार्यक्षम होण्यासाठी खते देण्याची वेळ आणि पद्धती, पाण्याचे अधिक चांगले व्यवस्थापन आणि तणांचा बंदोबस्त, पीक पद्धती आणि माती परीक्षा यानुसार रासायनिक खतांचे प्रमाण व वेळांच्या दृष्टीने नियोजन यासारख्या खतांचा वापर जास्तीत जास्त कार्यक्षम करणारी प्रगत कृषितंत्रे शेतकऱ्यांना समजावून देऊन त्यांना त्यांचा अवलंब करण्यास उद्युक्त करण्याची आवश्यकता आहे.

६८. आर्थिक व ऊर्जेच्या दृष्टीने खर्चिक रासायनिक खतांवरील अवलंबन कमी केले पाहिजे. त्यासाठी (१) पिके काढून झाल्यावर उरलेला काडीकचरा, पाळीव पशुपक्ष्यांची विष्ठा, मूत्र अशा असेंद्रीय पदार्थांपासून खते बनविणे, (२) उदयपूरच्या परिसरात सापडणाऱ्या खनिज फॉस्फेट सारख्या, कमी प्रतीचा असला तरी, देशात सापडणाऱ्या खनिजातूनच आवश्यक तेवढे फॉस्फरस (स्फुरद) मिळविणे आणि (३) बॅक्टेरिया, शेवाळे, रायझोबियम्, ॲझोला यांच्या साहाय्याने जमिनीतील नत्राचे प्रमाण जीवशास्त्रीय प्रक्रियेने स्थिर राखण्याचा प्रयत्न करणे यांवर आधारलेले धोरण ठरवावे लागेल.

६९. गायीगुरांच्या शेणाचे खतात रूपांतर करतांना गोबरगॅस संयंत्रांचा वापर केला तर एकाच वेळी खत आणि ग्रामीण घरांना इंधन मिळू शकेल. अशा तऱ्हेने खत बनविण्यासाठी उपयुक्त शेण, काडीकचरा इत्यादि स्वरूपातील असेंद्रीय पदार्थ ग्रामीण भागात सुमारे ६५ कोटी टन तयार होतो, पण त्यातील केवळ २६ कोटी ३० लाख टन खतात रूपांतरित करून वापरला जातो; शहरी भागातील १ कोटी ६० लाख टन कचऱ्यापैकी फक्त ६० लाख टनच अशा प्रकारे

वापरला जातो. कडधान्ये, तेलबिया, ताग आदी हिरव्या खतांची झाडे यांना रायझोबियम्ची आवश्यक ती मात्रा देऊन लाखो हेक्टर जमिनीत नत्राचे प्रमाण वाढवणे शक्य होईल. जैविक खतांचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन करून त्यांच्या वितरणाची व्यवस्था करण्याचा कार्यक्रम त्वरेने हाती घेणे आवश्यक आहे. निरूपयोगी झालेल्या जमिनींची सुधारणा करण्याच्या तसेच वनीकरणाच्या कार्यक्रमांत विविधोपयोगी शेंगवर्गीय झाडेझुडपे जाणीवपूर्वक लावली तर त्यामुळे बऱ्याच मोठ्या पडिक क्षेत्राचे पुनर्वसन होईल, ती पुन्हा सुपीक बनेल आणि त्यात रासायनिक खतांची गरजही कमी राहील.

७०. ऊर्जेच्या तुटवड्याला तोंड देता यावे यासाठी बायो-गॅस संयंत्रे, पवनचक्क्या यांच्या उभारणीला आणि इंधनपुरवठा करतील अशा लागवडींना उत्तेजन द्यायला हवे. सौरऊर्जेचा वापर करण्याच्या दृष्टीने भारताला काही ठोस व निर्णायक प्रयत्न करणे आवश्यक आहे. जंगलांच्या वाढीकडे, विशेषतः, योग्य तंत्रज्ञानाच्या साहाय्याने वीजनिर्मिती करता यावी हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून, प्राधान्याने लक्ष दिले पाहिजे.

७१. कीटकनाशके आणि विशेषतः तणनाशके यांचा वापर प्राथमिक अवस्थेत असला तरी त्यांच्या चुकीच्या वापरामुळे झालेले काही दुष्परिणाम आताच दिसू लागले आहेत. कीटक, उंदीर, घुशींसारखे प्राणी आणि विविध प्रकारची बुरशी यांच्या ठायी या औषधांना प्रतिकार करण्याची शक्ती निर्माण झाली असून ते आता या औषधांना दाद देईनासे झाले आहेत. त्यामुळे कापसासारख्या पिकांच्या बाबतीत औषधे वापरूनसुद्धा संपूर्ण पीक हातचे जाण्याचा गंभीर धोका उत्पन्न झाला आहे. त्यात, भेसळ ही नित्याची बाब बनली आहे. ज्या भागात अधिक उत्पादन देणारी बियाणी वापरली जातात तेथे कीटक, उंदीरघुशी आदी प्राणी व बुरशी यांच्या बंदोबस्तासाठी सर्वंकष यंत्रणा उभी करणे आवश्यक आहे. निसर्गचक्रांच्या साहाय्याने शेतीच्या या शत्रूंवर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीनेही संशोधन करणे उपयुक्त ठरेल.

## यांत्रिकीकरण

७२. लहान लहान शेतांची, प्रामुख्याने पावसावर अवलंबून असलेल्या भागातील, कार्यक्षमता सुधारावी यासाठी उचित तंत्रज्ञानासह लहान लहान शेतीऔजारे व यंत्रसामुग्रीचा प्रसार करावा लागेल. सध्या, इतर देशांमध्ये वापरात असलेली यंत्रसामुग्री आयात करून जशीच्या तशी शेतकऱ्यांच्या माथी मारली जाते. त्यात, काही ठराविक देशांतून अशा यंत्रसामुग्रीच्या आयातीला अग्रक्रम दिला जातो. जगाच्या इतर भागात वापरली जाणारी यंत्रसामुग्री आपल्या देशातील शेतीच्या परिस्थितीमध्ये जुळणारी आहे किंवा नाही याची तपासणी करूनच तशा बनावटीची यंत्रे वापरण्याबाबत निर्णय घ्यायला हवा. अशी यंत्रसामुग्री शेतांमध्ये वापरायला देण्याआधी काही यंत्रसामुग्री नमुन्यादाखल आणून त्यात आवश्यक ते बदल व सुधारणा करण्याच्या दृष्टीने देशाच्या वेगवेगळ्या भागात ती प्रायोगिक स्वरूपात वापरून पाहिली पाहिजे.

७३. बरीच यंत्रसामुग्री शेतीमध्ये काही काळापुरतीच वापरली जाते. (इतर वेळी ती पडूनच राहात असल्याने) ती विकत घेण्यासाठी संपूर्ण किंमतीची गुंतवणूक करणे व्यवहार्य नसते. तेव्हा अशा प्रकारची यंत्रसामुग्री व औजारे वगैरे भाड्याने देणारी सेवाकेंद्रे / ग्राहकसेवा संस्था सुरु करण्यास प्रोत्साहन देण्यात येईल.

## सामुग्रीचा पुरवठा

७४. शेतीतील उत्पादन व उत्पादकता वाढण्यासाठी शेतीव्यवसायासाठी आवश्यक सामुग्री उपलब्ध करणारे केंद्र प्रत्येक गावात असणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांना खते, बियाणी, औषधे (कीटकनाशके), पशु व पक्ष्यांचे खाद्य अशा चीजवस्तू या केंद्रातून सहजी उपलब्ध झाल्या पाहिजेत. अधिक मात्रांमध्ये रासायनिक खतांचा वापर होणाऱ्या विभागातील शेतीची उत्पादकता टिकवून ठेवण्यासाठी सूक्ष्मपोषण- द्रव्यांच्या वापराच्या दृष्टीने संशोधन व विस्तार कार्यक्रमाकडे विशेष लक्ष दिले पाहिजे.

७५. १९८९-९० या वर्षात देशातील शेतकऱ्यांनी ११ कोटी ७० लाख टन रासायनिक खते व पोषणद्रव्ये यांवर खर्च केला, म्हणजे त्यासाठी ६००० कोटी रुपयांहूनही अधिक रक्कम गुंतविली. शेतकऱ्यांना त्यांनी विकत घेतलेली सामुग्री योग्य दर्जाची आहे याची ग्वाही मिळाली पाहिजे. शेतकऱ्यांना त्यांनी विकत घेतलेली खते, बियाणी, औषधे आणि पशुपक्ष्यांचे खाद्य अशा वस्तूंचा दर्जा तपासून घेता यावा व त्याबद्दल स्वतःची खात्री पटवून घेणे शक्य व्हावे यासाठी ठिकठिकाणी सामुग्रीतपासणी केंद्रे सुरु करण्यास शासनाने चालना व प्रोत्साहन द्यावे.

७६. सर्वच पिकांसाठी अधिक उत्पादक बियाण्यांचा वापर वाढविण्यासाठी खास प्रयत्न करायला हवेत. तसेच, फळबागांसाठी दीर्घकालीन गुंतवणूक करावी लागते आणि शेतकऱ्यांनाही ही जबाबदारी दीर्घकाल पेलावी लागते हे लक्षात घेता फळबागायतीसाठी चांगल्यात चांगले लागवड साहित्य मिळविण्यासाठी (निवडण्यासाठी) देशातील व आंतरराष्ट्रीय पातळीवरील तज्ज्ञांच्या सल्ल्याचा वापर करण्यावर विशेष भर दिला जावा. शेतीव्यवसायाच्या सामुग्रीचे तसेच सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील रास्त भावांच्या वस्तूंचे किरकोळ विक्री केंद्र म्हणून ग्रामपंचायतीचा वापर करता येईल.

## शेतीउत्पादनात विविधता

७७. देशातील अन्नाची गरज अन्नधान्य, डाळी, तेलबिया यांच्या उपलब्धतेमध्ये मोजण्याचा काळ आता मागे पडला आहे. शहरातील लोकांचे वाढते उत्पन्न, नोकरी व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांचे वाढते प्रमाण, पाश्चिमात्य जीवनशैलीचा प्रभाव यांमुळे निवडलेले, स्वच्छ पदार्थ; तयार व प्रक्रिया केलेले अन्न तसेच पेये आणि मांस, दूध, कोंबड्या, मासे व त्यांपासून बनविलेले असे प्रथिने व सोडियमने समृद्ध पदार्थ यांची मागणी वेगाने वाढत आहे. सर्वच देशांमध्ये आर्थिक विकासाच्या बरोबरीने, प्राथमिक अवस्थेतील शेतीमालाऐवजी त्यापासून बनविलेल्या पदार्थांना प्राधान्य देणारी आहारक्रांती झाली आहे. प्राथमिक शेतीमालापासून तयार अन्नपदार्थ बनविण्याचे प्रमाण ३:१ आहे. तयार खाद्यपदार्थांची निर्मिती आहारक्रांतीची दखल घेऊन वाढविण्याची आवश्यकता आहे. शेतकऱ्यांनी पोतीच्या पोती भरून शेतीमाल घाऊक बाजारपेठेत नेण्याऐवजी अन्नधान्ये, डाळी इत्यादींचे निवडटिपण करून ग्राहकांना सोयीस्कर अशा छोट्यामोठ्या पिशव्यांमध्ये भरून ग्राहकोपयोगी बनविण्यास त्यांना उद्युक्त करावे लागेल. ज्यादा झालेला भाजीपाला व खाद्यपदार्थांवर प्रक्रिया करणारी व ते टिकवून साठविणारी आधारभूत प्रक्रियाकेंद्रे शेतकऱ्यांच्या किंवा ग्रामपंचायतींच्या आवाक्याच्या अंतरात असली पाहिजेत. खाद्यान्न विषयक तंत्रज्ञान हे अतिशय उच्च दर्जाचे व गुंतागुंतीचे तसेच आधुनिक क्षेत्र आहे. परदेशातून हे तंत्रज्ञान सुलभतेने आणले गेले पाहिजे. तसे, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन आणि अगदी

मस्त्यव्यवसाय या क्षेत्रांमध्ये लहान प्रमाणांतसुद्धा प्रक्रिया करून विविध प्रकारचे ग्राहकोपयोगी तयार खाद्यपदार्थ बनविणे शक्य आहे. खास पदार्थांच्या निर्मितीकेंद्रांनासुद्धा प्रोत्साहन देण्यात येईल.

७८. पूर्वापारपासून शेतीसंबंधित पूरक उद्योगांना, विशेषतः मस्त्यव्यवसाय, फलोत्पादन यांना जमीन, वीज, पाणी उपलब्ध करून देण्यात शेतीपेक्षा वेगळी वागणूक मिळते. आता, उत्पन्न व रोजगार यांत वाढ करणे तसेच अमूल्य परकी चलन मिळविणे या दृष्टीने शेतीव्यवसायामध्ये विविधता आणणारे बदल होणे आवश्यक झाले आहे. त्यामुळे मत्स्यव्यवसाय, फलोत्पादन व अन्य शेतीअनुषंगिक उद्योगक्षेत्रांना शेतीक्षेत्राचाच अविभाज्य भाग समजून प्रोत्साहन व प्रेरणा देणे ही तातडीची गरज झाली आहे. मत्स्यशेती व इतर व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांना वीज व पाणी शेतीसाठी ज्या दराने उपलब्ध होते त्याच दराने मिळाले पाहिजे. शेतीकडून इतर पूरक व्यवसायांकडे वळू पाहाणाऱ्या शेतकऱ्यांना वेगळी परवानगी आणि परवाने मिळविण्याची आवश्यकता असता नये. कूपनलिका खोदण्यासाठी शेतीसाठी जशा कर्जसुविधा उपलब्ध आहेत तशाच मत्स्यशेती करणाऱ्या शेतकऱ्यांना व फलोत्पादकांना मिळायला हव्यात.

### पशुपालन आणि दुग्धोत्पादन

७९. 'दूध महापूर' योजनेखाली दुधाचे आणि दुग्धजन्य पदार्थांचे संकलन, प्रक्रिया व पणन बऱ्याच राज्यांत सहकारी संस्थांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. मात्र, या व्यवसायक्षेत्राची प्रगती सगळीकडे सारखी नाही. उत्पादकता वाढविण्यासाठी शास्त्रीय संशोधनाच्या मदतीने या व्यवसायातील उत्पादकता, उत्पादन व संकलन वाढविणे आणि समाजाच्या मोठ्या भागामध्ये दूध व दुग्धजन्य पदार्थांचे सेवन वाढविणे शक्य होईल. भारतीय म्हशींचा दूध देणाऱ्या म्हणून पुरेपूर वापर केला गेला नाही. त्याचप्रमाणे, संकरित गायींचा विकास करण्याच्या नादामध्ये सक्षम देशी गायींच्या विकासाकडे दुर्लक्ष झाले आहे. उचित संशोधन आणि विस्तारसाहाय्याने ही त्रुटी दूर करण्यात येईल. बकरीपालनामध्ये भूमिहीनांचे उत्पन्न वाढविण्याची चांगली क्षमता आहे; या व्यवसायाला प्रोत्साहन दिले जाईल.

### कुक्कुटपालन

८०. देशाच्या काही भागात कुक्कुटपालनाच्या व्यवसायाची चांगली प्रगती झाली आहे. बऱ्यापैकी व्यवस्थापन तंत्र, चांगल्या दर्जाचे पक्षीखाद्य व पुरेशी पशुवैद्यकीय देखभाल यांच्या साहाय्याने कुक्कुटपालन हे सीमांत शेतकरी व भूमिहीनांना त्यांच्या उत्पन्नाला जोड देणारे ठरेल. कुक्कुटपालन उद्योगाला आर्थिकदृष्ट्या समर्थपणे उभे राहाता यावे यासाठी त्याला पणनाची सुविधा (सोयीची विक्रीव्यवस्था) व किमान भावाचा आधार दिला जाईल. या उद्योगातील उत्पादनांच्या निर्यातीला मोठा वाव असल्याने तिला प्रोत्साहन दिले जाईल.

### फलोद्यान विकास

८१. जसजसा राहाणीमानाचा दर्जा सुधारत जाईल तसतशी अधिकाधिक लोकांत पौष्टिक अन्नाचा महत्त्वाचा भाग म्हणून भाज्या व फळे यांची मागणी वाढत जाईल. भाज्या व फळे हा सहज नाशिवंत माल असल्यामुळे त्याची साठवणूक व विक्री योग्य तऱ्हेने करणे मोठे जिकरीचे असते. कलमे बांधण्याचे साहित्य, त्यासंबंधी सेवा व प्रशिक्षण सहजतेने उपलब्ध करण्याची आवश्यकता आहे. टेकड्यांच्या उतारावरील तसेच निकृष्ठ मातीच्या जमिनींवर कोरडवाहू फलोद्यान विकसित करणे याला सुदृढ शेतीव्यवस्थेमध्ये महत्त्वाचे स्थान राहील. त्यामुळे पर्यावरणाच्या संरक्षणासही मोठा हातभार लागेल. फळबागा उभ्या करण्यासाठी भांडवलगुंतवणूक करण्यास प्रोत्साहन मिळावे म्हणून फळबाजारात शासकीय हस्तक्षेपाचा पर्याय ठेवून किंमतीना संरक्षण दिले जाईल. फुलांची निर्यात वाढविण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून फुलांच्या शेतीचा विकास शास्त्रीय पायावर नियोजनपूर्वक केला जाईल.

### मत्स्यशेती

८२. प्रथिनयुक्त स्वस्त अन्नाचे उत्पादन वाढवून जनतेच्या पोषणाचा दर्जा सुधारणे, ग्रामीण भागातील उत्पादनांत विविधता आणणे, वाढीव उत्पन्न व रोजगाराची निर्मिती करणे, दारिद्र्य निर्मूलन, निर्यातीस वाव, कोळी समाज व मत्स्यशेती करणारे शेतकरी यांची सामाजिक-आर्थिक स्थिती सुधारणे अशा उद्देशांनी मत्स्यशेतीचा शास्त्रीय विकास केला जाईल. लहानमोठे तलाव, धरणांतील पाण्याचे साठे, नद्या, खाड्या, खाजणे अशा असंख्य पाण्यांच्या साठ्यांमध्ये मत्स्यशेती विकासाला वाव देण्याची प्रचंड क्षमता आहे. आपल्या देशाच्या सागरी सीमांतील बराच मोठा भाग समुद्री मत्स्यव्यवसायाच्या दृष्टीने वापरलाच गेलेला नाही. उत्पादन व उत्पादकता वाढविणे तसेच उपलब्ध साधन (जल) संपत्तीचा जास्तीत जास्त वापर करणे हे लक्ष्य ठेवून मत्स्यशेती विकासाची योजना आखावी लागेल. गोड्या पाण्यातील मासे आणि खाऱ्या पाण्यातील मासे या दोन्हींबाबत ग्राहक आणि उत्पादकांना लाभदायक ठरेल अशा विक्रीव्यवस्थेचा विकास केला जाईल; त्यासाठी मासे उतरविण्याच्या ठिकाणी आणि मुख्य बाजारांत माशांच्या साठवणुकीसाठी शीतगृहांची साखळी बनवून त्यांची वाहतूकही शीत-पेट्यांतून केली जाईल.

### वनशेती

८३. पर्यावरणाचा समतोल टिकविण्यामध्ये सामाजिक वनीकरण / वनशेतीला सर्वांत जास्त महत्त्व आहे असे मानले जाते. राष्ट्रीय वननीतीमध्येसुद्धा सामाजिक वनीकरण / वनशेतीला महत्त्वाची भूमिका आहे. उत्पन्नाचे साधन म्हणून व जमिनीच्या लहान तुकड्यांचा अधिक लाभदायक वापर व्हावा म्हणून शेतकऱ्यांना, विशेषतः, पतपुरवठ्याच्या साहाय्याने वनशेती करण्यास उद्युत केले जाईल.

**(क्रमशः)**

# गरीबांची गरीबी वाढविणारा श्रीमंती मदतीचा हात

पाश्चिमात्य वित्तसंस्था आशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिकेतील अविकसित देशांना दर वर्षी साडेचार ते सहा हजार कोटी डॉलर्स मदत किंवा सवलतीचे कर्ज म्हणून देतात तरीही त्या देशांतील दारिद्र्य वाढतच चालले आहे.

या विरोधाभासाचे कारण म्हणजे या परकीय मदतीचा फार मोठा हिस्सा तिसऱ्या जगाऐवजी पाश्चिमात्य धनको देशांतच खर्च होतो. "आंतराष्ट्रीय आरोग्य आणि विकास" या नियतकालिकातील एका अहवालात ही माहिती दिली आहे. हा अहवाल ग्रॅहम् हॅन्कॉक यांच्या "Lords of Poverty" या ग्रंथावर आधारित आहे.

या अहवालात म्हटले आहे, "तिसऱ्या जागातील राष्ट्रांना मदत करण्याच्या नावाने उपलब्ध केल्या जाणाऱ्या या निधीचा बराचसा भाग हा पाश्चिमात्य कंपन्यांकडून औद्योगिक माल खरेदी करण्यासाठी आर्थिक तरतूद म्हणून असतो किंवा या आंतरराष्ट्रीय मदतीसंबंधित नोकरशाहीच्या ऐषारामी जीवनशैलीसाठी खर्च होतो."

अहवालातील काही नोंदी पाहा.

* सोमालिया अत्यंत दरिद्री राष्ट्र. या राष्ट्रातील परकीय मदतीसंबंधी काम करणारा राष्ट्रसंघाचा सामान्य अधिकारी सहा आठवड्यांच्या भरपगारी सुट्टीसह ५५००० डॉलर्स वार्षिक पगार घेतो. ही रक्कम सोमालियाच्या कॅबिनेट मंत्र्याच्या पगाराच्या ५० पट आहे.
* १९७९ मध्ये कंबोडियामध्ये भयानक दुष्काळ पडला होता. त्यावेळी उत्पन्न झालेल्या अन्नपरिस्थितीवर उपाय शोधण्यासाठी नाम पेन्ह सरकारला सल्ला देण्यासाठी जागतिक आरोग्य संघटनेने एक वरिष्ठ अधिकारी नियुक्त केला होता. त्याच्या दोनेक आठवड्यांच्या वासतव्यावर सरकारला १६,००० डॉलर्स खर्च आला, वर भुकेने कासावीस झालेल्या सर्वसामान्य कंबोडियनाला वर्षभर जेऊ घालायला पुरली असती इतकी रक्कम सल्ल्यापोटी फी म्हणून द्यावी लागली, ते वेगळे.
* १९८६ मध्ये ७०० सामाजिक कार्यक्रमांसाठी जागतिक बँकेने घेतलेल्या बैठकांच्या खर्चात तिसऱ्या जगातील ४ कोटी ७० लाख मुलांना ए व्हिटॅमिनच्या साहाय्याने डोळ्यांच्या आजारापासून संरक्षण देता आले असते.
* बड्या राष्ट्रांच्या कल्याण व विकास कार्यक्रमातील नोकरशाहीचे ओझे अगडबंब असते. काही मदत संघटनांच्या कर्मचाऱ्यांचे पगार व जनसंपर्क, चर्चापरिसंवाद आदि तदनुषंगिक कार्यक्रमांवरील खर्चाची रक्कम योजनेच्या एकूण खर्चाच्या ८० टक्के असते.
* मदतकार्यातील बहुसंख्य अधिकारी (गरजू देशातीलच असले तरी) पाश्चिमात्य राष्ट्रांच्या राजधान्यांतच वास्तव्याला असतात. साहजिकच, त्यांना मिळणारा भरमसाठ पगार ते तिकडेच खर्च करतात.
* तिसऱ्या जगाला हात देण्यासाठी अवाढव्य बुलडोझर्स पासून प्रायोगिक सूर्यचुलींपर्यंत जी यंत्रसामुग्री व तंत्रज्ञान पुरवले जाते ते पाश्चिमात्य औद्योगिक कंपन्यांकडूनच विकत घेतले जाते आणि काही काही वेळा अवाजवी किंमती लावून. अशा तऱ्हेने जगासाठी म्हणून प्रगत पाश्चिमात्य राष्ट्रांनी दिलेला मदतनिधी पश्चिमी राष्ट्रांमध्येच खर्च होतो.

या अहवालात आणखी एक नोंद आहे. राष्ट्रसंघाच्या 'अन्न व कृषि संघटने'चे दोन तृतियांश अधिकारी व कर्मचारी अविकसित देशांतील कृषिप्रकल्पांवर न राहाता 'अन्न व कृषिसंघटने'च्या रोममधील मुख्य राजेशाही कार्यालयांतील टेबलांसमोर बसलेले असतात. जागतिक बँकेच्या संदर्भात हे प्रमाण ८० टक्के आहे.

अहवालात पुढे म्हटले आहे की हे अधिकारी दूर रोममध्ये असल्याने त्यांना प्रत्यक्ष शेतीच्या कामांमध्ये काही ढवळाढवळ करता येत नाही म्हणून तिसऱ्या जगातील शेतकऱ्यांच्या दृष्टीने ते तसे असणे चांगलेच आहे.

जागतिक बँकेच्या स्वतःच्या हिशोबतपासनीसांच्या अहवालानुसार बँकेने अर्थसाहाय्य केलेल्या विकासप्रकल्पांपैकी सरासरी ६० टक्के प्रकल्प अयशस्वी ठरतात. अतिगरीब देशांच्या बाबतीत अपयशाचे हे प्रमाण ७५ टक्के इतके प्रचंड असते.

* मालीच्या वाळवंटी प्रदेशात अमेरिकन मदतीवर मस्त्यशेतीचा प्रकल्प उभा केला गेला. त्यातून उत्पादित माशांचा उत्पादनखर्च प्रती किलो ४४०० डॉलर्स आला! मालीचे सरासरी दरडोई वार्षिक उत्पन्न आहे फक्त ४०० डॉलर्स.
* इजिप्तमध्ये १० कोटी डॉलर्स खर्च करून धान्याचे अत्याधुनिक हवाबंद कोठार उभे केले आहे. पण मुख्य वीजपुरवठा केंद्रापासून ते खूप दूर असल्याने अजून ते वापरात आलेले नाही.
* सुदानमध्ये ६१ कोटी ३० लाख डॉलर्स खर्चून साखर निर्मितीची प्रचंड यंत्रणा उभी केली. जवळात जवळचे बंदर १६०० किमी अंतरावर असल्याने व मध्ये रस्ताविहीन वाळवंट असल्याने ही यंत्रणा निरूपयोगी झाली आहे.

काही वेळा हे प्रकार नुसते हास्यास्पद आणि निरुपयोगी न राहाता खरोखरी शोकान्तक आणि भयावह ठरतात. जागतिक बँकेच्या एका योजनेत उत्तरमध्य ब्राझील व इंडोनेशियातील जनतेला हा दाहक अनुभव आला आहे.

* जागतिक बँकेने ४६ कोटी ४० लाख डॉलर्स खर्चून ब्राझीलमधील हजारो दारिद्र्यपीडित नागरिकांचे पुनर्वसन करण्यासाठी अमेझॉनच्या घनदाट जंगलाची तोड करून तेथे लहान लहान शेते निर्माण केली. पण जमिनीवरील झाडझाडोरा नष्ट झाल्याने ती उघडी पडली आणि दीर्घकालीन शेतीसाठी ती पोषणद्रव्यांनी कमी पडू लागली. परिणामी, आर्थिक लाभ काही न होता प्रचंड जंगलतोड मात्र झाली. आणि वांझ आणि मलेरियादूषित जमीन ब्राझीलमधील त्या गरीब शेतकऱ्यांच्या

(पान १२ पहा)

Posted at Market Yard, PSO, Pune 37.
On 20th July, 1991

**To**

**PNCW 281**
Licence to post without prepayment **No. 87**

**SHETKARI SANGHATAK**
(Marathi Fortnightly)
Regd. No. 39926/83
July 21, 1991

# प्रश्न : हरियाणातील शेतकरी बायांचा

**सौ. संध्या इंगोले, यवतमाळ**

१७ मे १९९१ रोजी हरियाणातील ३ व महाराष्ट्र, गुजरातमधील आम्ही ५ अशा ८ महिलांनी पंजाब हरियाणातील ५० भावांबरोबर चंडीगढ राजभवनासमोर सत्याग्रह करून अटक करवून घेतली. त्यानंतर दोन दिवसांनी हरियाणातील आणखी ४० महिला जेलमध्ये आल्या. जेलमध्ये प्रशिक्षण शिबीरेच चालू होती. त्याशिवाय गप्पागोष्टी, गाणीही चालायची. पुरुषांना जेलमध्ये फिरायला बंदी नव्हती. मात्र आमच्या हॉलचे गेट दुपारी १२ ते २ आणि रात्री ८ ते सकाळी ६ पर्यंत कुलुपबंद असायचे. गेटला पडदा म्हणून पोतेसुद्धा लावलेले असायचे. स्त्रिया म्हणून आमच्यासाठी ही खास संरक्षणाची व्यवस्था होती म्हणे.

मग आम्ही आतमध्येच हरियाणातील बायांबरोबर बोलत बसायचो, त्यांना प्रश्न विचारायचो. अन्नधान्याचे कोठार असलेल्या या राज्यांतील शेतकरी बायाही आपल्याकडच्या बायांप्रमाणेच दुःखी आहेत, किंबहुना त्यांचे दुःख काकणभर जास्तच असावे.

तिकडे स्त्रियांचे साक्षरतेचे प्रमाण फक्त १० टक्के आहे. पूर्वी कमी होते पण अलिकडच्या परिस्थितीत वाढले आहे.

पुरुषांपेक्षा स्त्रियांना काम जास्त करावे लागते. संपूर्ण शेती बाईच्या 'भरोस्या'वर आहे. त्या सांगत, 'आमच्याकडे परिस्थिती जरी बरी असली तरी प्रत्येक बाईला पहाटे ४ वाजता उठून घरचे काम, गाईम्हशीचे शेणगोठा करणे, दूध तापवणे व स्वयंपाक करणे अशी कामे आवरून ८ वाजता शेतात जावे लागते. तिथे गहू काढण्याची, मोळ्या करण्याची, रवी लावण्याची कामे करायची. संध्याकाळी घरी परतल्यानंतर घरचे काम, स्वयंपाकपाणी.' तिकडील माणसांचा आहारही भक्कम; आठदहा पोळ्यांचा. म्हणजे स्वयंपाकही जास्तच. त्यात दारूचे प्रमाण ६० ते ७० टक्के आहे. त्यामुळे पहाटेपासून काम करूनही, घरचा माणूस दारू पिऊन येऊन जेवून झोपल्याशिवाय जेवता, झोपता येत नाही; मग किती का वाजेनात. त्यात, मारण्याचे व त्रास देण्याचे प्रमाणही जास्त आहे.

हरियाणातील आणखी एक प्रथा बाईच्या कष्टात भर घालणारी आहे. मुलाचे लग्न होऊन सून घरात आली की तिचा सासरा घरात येत नाही. म्हणजे बाहेरच त्याला जेवण वगैरे दिलं जातं. घरात नवीन सून आहे म्हणून सासूसासऱ्यांना स्वातंत्र्य नाही.

प्रत्येक घरात १० ते ३० लिटर दूध असते. पण कोणीही दूध विकत नाहीत; घरीच खातात. उरल्यास दुसऱ्यांना फुकट देतात. प्रत्येक बाई वेळेला १ लिटर असे दिवसातून तीन वेळा तीन लिटर दूध पिते. बाळंतपणात बाई २५ किलो तूप खाते. रोजचे जेवण तुपाशिवाय होत नाही. पोळ्यांना तूप, भाजीत तूप. आणि डोक्याला लावायलासुद्धा तूपच.

अशा या दुधातुपाचं खाणाऱ्या बाईलासुद्धा, गावात रोजगार नसल्याने मुलगा बाहेर जातो आणि नोकरीला लागला म्हणजे मागे फिरून पाहात नाही याची बोच असते. कमी जमीन असलेल्या शेतकऱ्याच्या घरीसुद्धा १०० पोते गहू निघतो. पण इतके असूनही मुलांना चांगले खाऊ घालू शकत नाही, त्यांचे हट्ट पुरवू शकत नाही याचे त्यांना वाईट वाटत असते.

बाई जर विधवा झाली आणि घरात दीर असेल तर 'चादर ओढली' जाते. तिच्या पदरी मूल असेल तर ती दुसऱ्या कुटुंबात जाऊच शकत नाही.

येथील महिलांमध्ये हुक्का व विड्या पिण्याचे प्रमाण फार आहे. जेलमध्येसुद्धा त्या गोवऱ्यांचे पोते आणि ४ किलो तंबाखू घेऊन आल्या होत्या. ही सवय शरीराच्या दृष्टीने वाईट आहे असे समजावून सांगण्याचा आम्ही खूप प्रयत्न केला. पण त्यांच्या जीवनात तेवढाच एक भाग विरंगुळ्याचा, स्वातंत्र्याचा असल्यासारखे त्यांना वाटते. त्यांची ही सवय सुटणे कठीण आहे.

स्त्रिया म्हणून त्यांच्या समस्या आणि आमच्या समस्या दिसतात वेगळ्या पण आम्ही दोघीही दुःखीच आहोत. त्यांचे दुःख जरा दुधातुपात घोळलेले आहे, इतकाच काय तो फरक.

---

**(पान ११ वरून)**

गळ्यात आयुष्यभरासाठी पडली.

* अशाच प्रकारे १०० कोटी डॉलर्सच्या खर्चाने इंडोनेशियातील लाखो गरीब शेतकऱ्यांच्या नशिबी वाळवंट आले.

प्रचंड खर्च करूनसुद्धा प्रकल्प अयशस्वी होण्याचे मुख्य कारण म्हणजे मोठ्या शहरातील उच्चशिक्षित लोक, जे मोठमोठे पगार घेऊन या प्रकल्पांचे काम पाहातात, ते ज्या शेतकऱ्यांच्या जीवनात बदल घडवून आणण्यासाठी हे प्रकल्प असतात त्यांची मते न ऐकण्याची मग्रुरी तर करतातच पण ती समजण्याची त्यांची पात्रताही नसते.

या अहवालात शेवटी म्हटले आहे, "या मदतीपेक्षा अविकसित देशातील गरीबांचे अशी मदत न मिळण्याने भले होण्याची शक्यता जास्त आहे.

"या प्रचंड मदती बंद झाल्या तर अविकसित देशातील केवळ काही लाख उच्चशिक्षित नोकरीबहाद्दरांना आपल्या गुबगुबीत पगाराच्या नोकऱ्यांना मुकावे लागेल याचा त्रास होईल, एवढेच."

**(इकॉनॉमिक टाईम्स, २७ मे १९९१ वरून)**

**पाक्षिक शेतकरी संघटक**
**मालक – मोहन बिहारीलाल परदेशी**
**मुद्रण स्थळ – चाकण प्रिंटिंग प्रेस, चाकण**

**संपादक, मुद्रक, प्रकाशक**
**सुरेशचंद्र म्हात्रे**

**६ व २१ तारखेला प्रसिद्ध होतो.**
**प्रकाशन स्थळ व पत्रव्यवहाराचा पत्ता**
**११८७/६६ शिवाजीनगर, पुणे ४११ ००५.**